श्री सिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास समिती, प्रभादेवी, मुंबई या कार्यालयातील "उप कार्यकारी अधिकारी" या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करणेबाबत

श्री.गिरीष गणपत सुर्वे, कक्ष अधिकारी

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन आदेश क्र.प्रतिनि-१०२६/प्र.क्र.३९/प्रशा-२
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- ०६ नोव्हेंबर, २०२६

शासन आदेश

श्री.गिरीष गणपत सुर्वे, कक्ष अधिकारी, गृहनिर्माण विभाग यांची विधि व न्याय विभागाच्या अधिनस्त **श्री सिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास समिती, प्रभादेवी, मुंबई** या कार्यालयातील **"उप कार्यकारी अधिकारी"** या पदावर प्रथमत: ०३ वर्षाच्या कालावधीसाठी खालील नमूद अटी व शर्तींच्या अधीन राहून प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात येत आहे **:-**

अ) श्री.सुर्वे**,** कक्ष अधिकारी ज्या तारखेला प्रतिनियुक्तीच्या पदावर रुजू होतील, त्या तारखेपासून प्रतिनियुक्तीच्या सेवेचा प्रारंभ होईल. त्यानंतर ३ वर्षांनी प्रतिनियुक्तीच्या पदाचा कार्यभार सूपूर्द करुन ते त्यांच्या मूळ विभागात ज्या तारखेला रुजू होतील, त्या तारखेला त्यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी समाप्त होईल.

ब) जर त्यांची सेवा लोकसेवेच्या हिताच्या दृष्टीने शासनाला आवश्यक वाटली तर प्रतिनियुक्तीचा कालावधी संपण्यापूर्वी कोणत्याही वेळी त्यांना परत बोलावून घेण्याचा अधिकार शासन/सक्षम प्राधिकाऱ्यास राहील.

क) जर त्यांची सेवा स्वीयेतर नियोक्त्याला आवश्यक वाटली नाही तर त्यांना मूळ विभागाकडे परत पाठविण्याची मुभा स्वीयेतर नियोक्त्याला राहील. मात्र याप्रमाणे परत पाठविण्यापूर्वी स्वीयेतर नियोक्त्याने शासनाला/सक्षम प्राधिकाऱ्याला तीन महिन्यांची नोटीस दिली पाहिजे.

ड) श्री.सुर्वे हे आदेशात विहीत केलेला प्रतिनियुक्तीचा कालावधी पूर्ण होण्यापूर्वीच स्वतःहून मूळ प्रशासकीय विभागात/कार्यालयात परत जाण्यास इच्छुक असल्यास त्यांनी समर्थनीय कारण स्पष्ट करुन त्यासाठी किमान तीन महिन्यांची पूर्वसूचना (नोटीस) दोन्ही प्रशासकीय विभागास/कार्यालयास देणे आवश्यक राहील. अशा परिस्थितीत त्यांच्या विनंतीवरुन प्रतिनियुक्ती संपुष्टात आणण्याचा निर्णय शासनाने/सक्षम प्राधिकाऱ्याने घेतल्यास**,** श्री.सुर्वे यांच्या पूर्ण सेवाकाळात अनुज्ञेय एकूण १० वर्षांच्या प्रतिनियुक्ती कालावधीतून आदेशात विहीत केलेला प्रतिनियुक्तीचा कालावधी त्यांनी उपभोगल्याचे समजण्यात येईल. तसेच, त्यांनी प्रतिनियुक्तीचा कालावधी संपण्यापूर्वी/संपल्यानंतर संवर्ग नियंत्रक विभाग म्हणून सामान्य प्रशासन विभागात रुजू होणे आवश्यक राहील.

इ) श्री.सुर्वे यांना प्रतिनियुक्ती धोरणाच्या दिनांक १७.१२.२०१६ व दिनांक १६.०२.२०१८ रोजीच्या शासन निर्णयामधील इतर सर्व अटी व शर्ती लागू राहतील.

२. महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा.....इ.) नियम १९८१ मधील नियम ४० (परिशिष्ट दोन व तीन) मधील तरतुदी विचारात घेऊन गृहनिर्माण विभाग व विधि व न्याय विभाग (कार्यासन-१६) यांनी श्री.सुर्वे यांच्या प्रतिनियुक्तीबाबतच्या अटी व शर्ती ठरवाव्यात.

३. श्री.गिरीष गणपत सुर्वे, कक्ष अधिकारी यांच्या इतर सर्व प्रशासकीय बाबी गृहनिर्माण विभागामार्फत हाताळण्यात येतील.

४. श्री.गिरीष गणपत सुर्वे, कक्ष अधिकारी यांना प्रतिनियुक्तीवरील नियुक्ती स्वीकारण्यासाठी गृहनिर्माण विभागाने कार्यमुक्त करावे.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६११०६१३११४१६१०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

GAJANAN SAHADEO PARAB

Digitally signed by GAJANAN SAHADEO PARAB
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPT, 2.5.4.20=23BC53B7F4F1CA24AD7FDD55B639979816E6E784D75D5396D0F50367308ECC8B, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=6E3168FC30A0E07A9B8D13F2A24C658F97BA49C1AB3A023B1606696C2202DDD, cn=GAJANAN SAHADEO PARAB
Date: 2026.11.06 13:12:54 +05'30'

(ग. स. परब)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

श्री.गिरीष गणपत सुर्वे, कक्ष अधिकारी, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई

.....(प्रशासकीय विभागामार्फत)

प्रत:-

१) अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
२) अ.मु.स./प्र.स./सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई
३) प्रधान सचिव व विधि परामर्शी, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई
४) सह/उप सचिव (आस्थापना), गृहनिर्माण विभाग व सह/उप सचिव (कार्या-१६), विधि व न्याय विभाग,

यांना विनंती करण्यात येते की, श्री.गिरीष गणपत सुर्वे, कक्ष अधिकारी यांच्या प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्ती नमूद केलेल्या आदेशाची एक प्रत या कार्यासनाकडे पाठविण्यात यावी.

५) कार्यकारी अधिकारी, श्री सिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास समिती, प्रभादेवी, मुंबई
६) निवड नस्ती/प्रशा-२